ePaper
वाल्मिक कराडसाठी समर्थकाने पेटवून घेतले, अंगाला आग, पाय जळाला
॥ वर्ष - 8 । अंक -186 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 15 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत

- रोमहर्षक सामन्यात भारताने केला नेपाळचा पराभव
- रणबीर आणि आलिया न्यूयॉर्कहून परतले


## संतोष देशमुख हत्येप्रकरणी धस पुन्हा कडाडले

# आकाला मोकोका!

## आता राष्ट्रपतींकडे माफीनामा पाठवला तरी लढा चालूच राहणार

। बीड ।महाईन्यूज

**संतोष देशमुख हत्येप्रकरणी सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई झाली आहे. यातच या हत्येचा सूत्रधार मानला जाणाऱ्या वाल्मिक कराडवर देखील अखेर मकोका लावण्यात आला आहे. दरम्यान सुरेश धसांनी हे प्रकरण लावून धरले आहे. त्यांनी आक्रमक पवित्रा घेत मंत्री धनंजय मुंडेंना देखील घेरले आहे. आज वाल्मिक कराडांवर मोक्का दाखल झाला असता त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे.**



संबंधित वृत्त पान 5 वर

सुरेश धस म्हणाले, मी काय याप्रकरणी बोलायला ज्योतिषी नाही मात्र त्या परिसरात विचारलं तर काय काय घटना घडली त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड झाला आहे. मी अगोदरच त्याबाबत सांगितलं होतं, तो पोलिसांनी संबंधित कंपनीकडून प्राप्त करून घेतला असेल. पण पुढे कायदेशीर कारवाई होईलच. आता माझ्याकडे पुरावे असायला मी काही जेम्स बाँड नाही, पुरावे पोलीस गोळा करत आहेत. महाराष्ट्राचे पोलीस आणि सीआयडी अधिकारी हे जेम्स बाँड पेक्षाही प्रभावी आहेत.

दरम्यान कराडांच्या पत्नी मंजिरी कराडांकडून सुरेश धस यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. या आरोपांना प्रत्युत्तर देताना सुरेश धसांनी टीका केली आहे. धस म्हणाले, ते माझ्यावर काही आरोप लावू शकत नाहीत. त्यांना संविधानानं आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. यापुढे जर कोणी कोणाची हत्या केली, तर त्याच्या बाजूने आंदोलन करण्याची नवीन प्रथाच महाराष्ट्रात पडेल, अशा शब्दांत त्यांनी सुनावले.

पुढे बोलताना धसांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. 'पोलिसांनी याप्रकरणी सगळं काही सापडलं आहे. कोणी धमकी दिली? कोणी उचलून आणायला सांगितलं? कोणी मारायला सांगितलं? या सर्व गोष्टींचे आका हे वाल्मिक कराडच आहेत हे आता सिद्ध झालं आहे. या प्रकरणात माझा लढा राष्ट्रपतींकडे माफीनामा पाठवला तरी चालूच राहणार. यामधील सर्वांना फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी हा सुरेश धस प्रयत्न करणार,' असे सुरेश धस म्हणाले.

### वाल्मिक कराडसाठी समर्थकाने पेटवून घेतले

वाल्मिक कराड समर्थक परळीत अधिकच आक्रमक झाले आहेत. दिवसभरात तीन जणांनी अंगावर रॉकेल ओतून पेटून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण नागरिकांनी त्यांना वाचवलं. पण आज रात्री वाल्मिक कराड याच्या एका समर्थकाने तर अंगाला आग लावून घेतली. या आगीत त्याचे पाय जळाले. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाण्याबाहेरच हा प्रकार घडला. त्यामुळे एकच वातावरण तापलं आहे. कराड समर्थक प्रचंड आक्रमक झाले असून जोरदार घोषणा देत आहेत.

## पुणेकरांचीवाहतुकीची समस्या सुटणार!

### राज्य सरकारचा मोठा निर्णय, पात्र कंत्राटदारांना कार्यदिश

। बीड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. पुणे रिंग रोडसाठी भूसंपादनही अंतिम टप्प्यात आले आहे. प्रकल्पातील नऊ टप्प्यांतील कामाचे कंत्राट बहाल करून पात्र कंत्राटदारांना कार्यदिश देण्यात आले आहेत.**



पुणे शहरातील सर्वात मोठी समस्या म्हणजे वाहतूक कोंडी आहे. टॉमटॉमच्या ट्रॅफिक इंडेक्सनुसार वाहतूक कोंडी असणारे पुणे जगातील चौथ्या क्रमांकाचे तर भारतातील तिसरे शहर आहे. परंतु आता पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याचा उपाय करण्यात येणार आहे. पुण्यात रिंग रोड हा वाहतूक कोंडी दूर करण्याचा मोठा उपाय आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून रिंग रोड तीन टप्यासाठी आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्या आहे. एमएसआरडीसीकडून पुण्यात १२६ किमी लांबीच्या रिंगरोड रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. पुणे रिंग रोडसाठी भूसंपादनही अंतिम टप्प्यात आले आहे. प्रकल्पातील नऊ टप्प्यांतील कामाचे कंत्राट बहाल करून पात्र कंत्राटदारांना कार्यदिश देण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे काम १२ टप्प्यांत होणार असून यापूर्वी नऊ टप्प्यांतील कामासाठी निविदा अंतिम करून कंत्राट बहाल करण्यात आली.आता उर्वरित तीन टप्प्यांतील कामासाठीच्या आर्थिक निविदा सोमवारी खुल्या करण्यात आल्या.

### कसा आहे रिंग रोड प्रकल्प

पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करणारा रिंग रोड प्रकल्प खेड, मुळशी, मावळ आणि हवेली या चार तालुक्यातून जात आहे. या चार तालुक्यातील ४४ गावांमधून त्यासाठी जमीन संपादीत केली जात आहे. १५ ते २० किलोमीटरवर हे रिंगरोड असणार आहे. यामुळे बाहेर गावातून येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहनांना पुणे शहरात येण्याची गरज पडणार नाही. त्यांना रिंगरोडने परस्पर पुणे शहराबाहेरून पुढील प्रवासासाठी जाता येणार आहे. या प्रकल्पामुळे पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील वाहतूक समस्या सुटणार आहे.

# पादचारी भुयारी मार्ग असुरक्षित!

## महिला व विद्यार्थिनींच्या दृष्टिने हे भुयारी मार्ग गैरसोयीचे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील महामार्गांसह मुख्य रस्ते प्रशस्त आहेत. हे रस्ते ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांच्या सोईसाठी पादचारी भुयारी मार्ग महापालिकेने निर्माण केले आहेत. मात्र, सुरक्षेचा अभाव, अस्वच्छता, गैरवर्तन, मद्यपींचा अड्डा असे ग्रहण या मार्गांना लागले आहे. मद्यप्राशन केलेल्या व्यक्ती भुयारी मार्गात झोपलेले असतात. त्यामुळे महिला व विद्यार्थिनींच्या दृष्टिने हे भुयारी मार्ग असुरक्षित होताना दिसत आहेत.**



महापालिकेने सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी मुंबई-पुणे महामार्ग प्रशस्त केला आहे. त्याशिवाय, आळंदी-पुणे पालखी मार्ग, निगडी-भोसरी टेल्को रस्ता, औंध-रावेत-किवळे बीआरटी मार्ग, देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता चिखली बीआरटी हे रस्तेही प्रशस्त झाले आहेत. मुख्य रस्ता, बीआरटी मार्गिका, सेवा रस्ता, सायकल ट्रॅक, पदपथ अशी काही रस्त्यांची रचना आहे. रुंदी व रहदारी अधिक असल्याने थेट रस्ता ओलांडणे पादचाऱ्यांसाठी धोकादायक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी काही ठिकाणी भुयारी मार्ग निर्माण केले आहेत. मात्र, सोय व सुरक्षेऐवजी गैरसोय आणि असुरक्षितताच अधिक आहे. त्यामुळे पादचारी नागरिक विशेषतः महिला व विद्यार्थिनी हैराण झाल्या आहेत. मद्यपी, अस्वच्छतेमुळे दुर्गंधीचा त्रास प्रत्येक ठिकाणी सहन करावा लागत आहे. याकडे महापालिका व पोलीस प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. सुरक्षारक्षक नेमावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, विद्यार्थ्यांना भुयारी मार्गातून जाताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तेथून जाताना भीती वाटते. सुरक्षारक्षक नसतात. मद्यपी झोपलेले असतात. त्यामुळे दिवसाही तेथून जाताना भिती वाटते. मनात भीती कायम असते. रात्री दहानंतर भुयारी मार्गातून जाणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने सुरक्षारक्षक नियुक्त करावेत, अशी मागणी तेजश्री आल्हाट यांनी केली. पुणे-मुंबई जुन्या महामार्गावर निगडी येथील भुयारी मार्गाचे फायदे कमी आणि तोटेच जास्त झाले आहेत. हा भुयारी मार्ग मद्यपींचा अड्डा बनलेला आहे. भुयारी मार्गाच्या जवळच मद्य विक्रीची दुकाने आहेत. त्यामुळे या भुयारी मार्गाचा वापर सामान्य नागरिकांपेक्षा मद्यपीच मोठ्या प्रमाणात करत आहेत. त्यामुळे भुयारी मार्गाचा वापर करणे नकोसे झाल्याचे कुणाल उकिरडे म्हणाले.निगडी, काळेवाडीतील भुयारी मार्गात दिवसा सुरक्षारक्षक नियुक्त केले आहेत. विशेषतः मुलांच्या शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळा निश्चित करून सुरक्षारक्षकाचे नियोजन केले आहे. नागरिकांच्या मागणीनुसार सुरक्षारक्षक नियुक्त केले जातील. मद्यपी रात्री तिथे बसत असल्यास पोलिसांकडे तक्रार दिली जाईल. महापालिकेच्या माध्यमातून सुरक्षेच्या दृष्टिने उपाययोजना केली जाईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे यांनी सांगितले.महापालिकेने सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी मुंबई-पुणे महामार्ग प्रशस्त केला आहे. त्याशिवाय, आळंदी-पुणे पालखी मार्ग, निगडी-भोसरी टेल्को रस्ता, औंध-रावेत-किवळे बीआरटी मार्ग, देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता चिखली बीआरटी हे रस्तेही प्रशस्त झाले आहेत.

### तेथून जाताना भिती मनात भीती

मुख्य रस्ता, बीआरटी मार्गिका, सेवा रस्ता, सायकल ट्रॅक, पदपथ अशी काही रस्त्यांची रचना आहे. रुंदी व रहदारी अधिक असल्याने थेट रस्ता ओलांडणे पादचाऱ्यांसाठी धोकादायक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी काही ठिकाणी भुयारी मार्ग निर्माण केले आहेत. मात्र, सोय व सुरक्षेऐवजी गैरसोय आणि असुरक्षितताच अधिक आहे. त्यामुळे पादचारी नागरिक विशेषतः महिला व विद्यार्थिनी हैराण झाल्या आहेत. मद्यपी, अस्वच्छतेमुळे दुर्गंधीचा त्रास प्रत्येक ठिकाणी सहन करावा लागत आहे. याकडे महापालिका व पोलीस प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. सुरक्षारक्षक नेमावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, विद्यार्थ्यांना भुयारी मार्गातून जाताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तेथून जाताना भीती वाटते. सुरक्षारक्षक नसतात. मद्यपी झोपलेले असतात. त्यामुळे दिवसाही तेथून जाताना भिती वाटते. मनात भीती कायम असते.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बारामती सज्ज

## 15 ते 19 जानेवारी 2025 कालावधीत बारामतीत कबड्डीचा थरार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या 23 व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बारामती शहर सज्ज झाले आहे. 15 ते 19 जानेवारी 2025 कालावधीत बारामतीत कबड्डीचा थरार रंगणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली आहे.**



ऑलिम्पिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन व राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यत आले आहे. स्पर्धेचा उद्घाटन 15 जानेवारीला सायंकाळी 6 वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभ हस्ते व क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांची प्रमुख पाहुणे उपस्थिती राहणार आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ 19 जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व् क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे,मंत्री क्रीडा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होईल.उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ व स्पर्धा कालावधीत सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार असून महाराष्ट्रातील प्रादेशिक नृत्ये व संगीत याची मेजवानी क्रीडा रसिकांना मिळणार आहे. फटाक्यांची आतषबाजी व नेत्रदिपक लेझर शो स्पर्धेची झळाळी उंचविणार आहेत. स्पर्धेसाठी आत्याधुनिक मॅटची मैदाने तयार करण्यात आलेली असुन प्रेक्षकांच्या करीता भव्य बैठक गॅलरी उभारण्यात आलेली आहे. ही स्पर्धा साखळी व बाद फेरी पद्धतीने खेळविली जाणार असून सायंकाळी 4.00 ते 8.00 वाजेपर्यंत रेल्वे मैदानावर प्रकाशझोतात सामने होणार आहेत.

### भव्य बैठक गॅलरी उभारण्यात आली

बारामती शहराला दुस-यांदा या क्रीडा स्पर्धा आयोजनांचा बहुमान प्राप्त झालेला आहे यापुर्वी सन 2009-10 मध्ये या स्पर्धेचे दिमाखदार आयोजन बारामती शहराने केलेले होते.ऑलिम्पिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन व राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यत आले आहे. स्पर्धेचा उद्घाटन 15 जानेवारीला सायंकाळी 6 वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभ हस्ते व क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

## एक लाख रुपयांहून अधिक मालमत्ता कर

# थकबाकीदारांच्या दारात आता बॅण्डवादन!

### पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचा निर्णय, कर संकलन विभाग गेल्या वर्षीपेक्षा उत्पन्नात यंदा मागे

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या दहा वर्षांपासून पाठपुरावा सुरू असलेल्या लघुउद्योजकांच्या उपकेंद्र उभारण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर या तीन ठिकाणी उपकेंद्र विस्तारित करण्याचा प्रस्ताव मंजूर आहे. मात्र, हा प्रस्ताव धुळखात पडून आहे. उपकेंद्र नसल्याने दर दिवशी खंडित वीज पुरवठ्याने उद्योजक त्रस्त आहेत. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. ही उपकेंद्र प्रत्यक्ष अस्तित्वात आल्यास पिंपरी, चिंचवड, भोसरी परिसरातील सुमारे १८ हजार उद्योजकांना त्याचा फायदा होणार आहे.**




एक लाख रुपयांहून अधिक मालमत्ता कराची थकबाकी असणाऱ्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर लाखबंद (सील) कारवाईनंतर आता थकबाकीदारांच्या दरवाजासमोर बॅण्डवादन केले जाणार आहे. खासगी संस्था, शाळा व महाविद्यालये, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शो रूम, मंगल कार्यालये, बँका, मॉल, चित्रपटगृहे अशा बड्या थकबाकीदारांच्या मालमत्तांसमोर बॅण्डवादन करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कर संकलन विभाग गेल्या वर्षीपेक्षा उत्पन्नात यंदा मागे आहे. त्यामुळे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी बैठक घेत शहरातील बड्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार थकबाकीदार मालमत्ताधारकांमध्ये जनजागृती, संदेशाच्या माध्यमातून कराचा भरणा करण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. मालमत्ता लाखबंदची कारवाई केली जात आहे. कर संकलन विभागाच्या पथकांनी आतापर्यंत ४१८ मालमत्ता लाखबंद केल्या आहेत. त्यांच्याकडे ११ कोटी ३७ लाख २३ हजार ११८ रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. मालमत्ता जप्ती कारवाईच्या वेळेस १ हजार ५११ मालमत्तांनी एकूण २६ कोटी ९२ लाख ७३ हजार ७४९ रुपयांचा भरणा केला आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत आकारणी न झालेल्या मालमत्तांचे नोंदणी व कर आकारणीची कार्यवाही करण्यासाठी स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लि या खासगी कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. या कंपनीने केलेल्या सर्वेक्षणात आढळलेल्या मालमत्तांपैकी ६४ हजार २६० मालमत्तांना नव्याने कर आकारणी करण्यात आली आहे.

#### गृहनिर्माण सोसायटीच्या अध्यक्षांकडे यादी

मालमत्ता सर्वेक्षणामध्ये नव्याने आकारणी झालेल्या ६९० गृहनिर्माण सोसायट्यांमधील ५६ हजार २३२ मालमत्तांना मालमत्ता कराची देयके बजाविण्यात आली आहेत. ६५१ सोसायट्यांमधील ३६ हजार ९८० मालमत्ताधारकांकडे ६९ कोटी ५६ लाख रुपयांचा कर थकीत आहे. त्यामुळे ६५१ सोसायट्यांच्या अध्यक्षांना सोसायटीमधील थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांची यादी देण्यात येणार आहे. या थकबाकीदारांना कर भरण्याचे आवाहन अध्यक्षांनी करावे, असे पत्रही देण्यात येणार आहे.

थकबाकी असलेल्या हॉटेल, मॉल, पेट्रोल पंप, चित्रपटगृहे, मंगल कार्यालये, औद्योगिक कारखाने, खासगी रुग्णालये, शाळा व महाविद्यालये या बिगरनिवासी मालमत्ता लाखबंद करण्यात येणार आहेत. या मालमत्तांसमोर बॅण्ड वाजविण्यात येणार आहे, असे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

---

## सायबर क्राइम : महिन्याला दहा टक्के परतावा?

### उच्चशिक्षित तरुणाची 80 लाख रुपयांची अशी झाली फसवणूक...

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून दर महिन्याला दहा टक्के परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने पिंपरी- चिंचवड मधील उच्चशिक्षित तरुणाची ८० लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उजेडात आले आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड सायबर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. अविनाश सिंग आणि रवी ठाकूर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोघेही मार्केटिंग आणि साखळी पद्धतीने उच्चशिक्षित तरुणांना त्यांच्या जाळ्यात ओढत होते. याबाबत सेमिनार घेऊन त्यांना कशा पद्धतीने परतावा मिळू शकतो. याबद्दल ते पटवून द्यायचे.**



सायबर गुन्हेगारी मध्ये अनेक उच्चशिक्षित तरुण अडकत असल्याचं वारंवार समोर येत आहे. पिंपरी- चिंचवड शहरातील उच्चशिक्षित असलेल्या तरुणाला क्रिप्टो करन्सीच्या माध्यमातून ८० लाख रुपयांना गंडा घातला आहे. आरोपी अविनाश सिंग आणि रवी ठाकूर हे ओरीस कॉइन कंपनीच्या माध्यमातून विविध उच्चशिक्षित तरुणांना आपल्या जाळ्यात ओढत, क्रिप्टोकरन्सीची कंपनी असल्याचं ते भासवायचे. दर महिन्याला दहा टक्के परतावा मिळवण्याच्या आमिषाने त्यांना पैसे गुंतवण्यास भाग पाडायचे. काही जणांना त्यांनी ते पैसे दिले. परंतु, फिर्यादी यांनी तब्बल ८० लाख रुपये त्यांच्याकडे गुंतवले होते. त्यांना तो परतावा मिळाला नाही. त्यानंतर त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचं समोर आलं.

या प्रकरणानंतर फिर्यादी यांनी पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांकडे धाव घेऊन याबाबत रीतसर तक्रार नोंदवली.

#### सायबर पोलिसांकडून शोध सुरु

सायबर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान याप्रकरणी अशी फसवणूक इतर कोणाची झाली असल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा असं आवाहन देखील सायबर पोलिसांकडून करण्यात आलं आहे. या प्रकरणांमध्ये ओरिस कॉइन कंपनीचे मालक राहुल खुराना आणि तरुण त्रिका या दोघांचा सायबर पोलीस शोध घेत आहेत.

# आंबेडकरी चळवळीची वाढ खुंटलेली कशी?



## भूमिका

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले जावे, या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीने तब्बल १६ वर्षे संघर्ष केला, अनेकांच्या बलिदानानंतर अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी नामविस्तार (‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ’) करण्यात आला.**

या घटनेला यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात नामांतराचा लढा हा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरलेला आहे. तो आंबेडकरी चळवळीसाठी केवळ चळवळीच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा लढा नाही, तर तो वैचारिक संघर्षाचा, जातीयवादी मानसिकतेविरुद्धचा लढा आहे. या लढ्याने महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय वातावरण बदलले. त्यातूनच चळवळीत नवनवीन नेतृत्व निर्माण होऊ लागले. परंतु सामाजिक परिवर्तनाच्या आणि समतेच्या चळवळीच्या दृष्टीने या लढ्यानंतर आंबेडकरी चळवळीने जी गती घ्यायला हवी होती, ती अद्यापही दिसून येत नाही. किंबहुना पुन्हा एकदा सामाजिक, धार्मिक, जातीय, सांस्कृतिक संघर्ष अटळ बनलेला आहे. आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक काळ निर्माण झालेला आहे. म्हणून सिंहावलोकन करणे गरजेचे आहे. विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्यानंतर




चळवळीने एक लढा जिंकला. परंतु त्या लढ्याचे सामाजिक, राजकीय पडसाद आणि परिणाम दीर्घकालीन राहिले. चळवळीतील पोचीराम कांबळे असेल, गौतम वाघमारे असतील किंवा इतर अनेक भीमसैनिक असतील, त्यांनी दिलेले बलिदान, अनेकांच्या घरांची झालेली राखरांगोळी ही कधीही विसरता येण्यासारखी नाही. मात्र नामांतरानंतर आंबेडकरी चळवळीने सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या सुसंघटित होऊन अधिक ताकदीने विधायक प्रश्न हाती घेऊन काम करणे गरजेचे होते, ते फारसे घडताना दिसले नाही. चळवळीतील नेतृत्वाने प्रसंगानुरूप भावनिक प्रश्नांना हात घातला आणि दीर्घकालीन प्रश्न बाजूला पडले. त्यामुळे चळवळ सर्वार्थाने बळ धरू शकली नाही. पुढच्या काळात रिपब्लिकन नेत्यांच्या गटबाजीमुळे त्याचे गंभीर परिणाम दिसून आले. आंबेडकरी चळवळीला, त्यामधील रिपब्लिकन पक्ष असो वा अन्य आंबेडकरी पक्ष संघटन असोत, त्यांना एकाकी पाडले गेले. तीन दशकांमध्ये आंबेडकरी चळवळीचा दबदबा कमी होत गेला आणि संसदीय राजकारणातून आंबेडकरी पक्षांचे अस्तित्त्व संपुष्टात आल्याचे दिसून आले. वैचारिक बांधिलकीही राहिली नाही. केवळ सत्तेसाठी कुठेही धावण्याची कसरत सुरू झाली. अन्याय अत्याचाराच्या घटना कमी झाल्या नाहीत. उलट त्यात वाढ होतानाच दिसून आली. समाजासमोरचे प्रश्न दिवसागणिक वाढत चालले आहेत. नोकरी, शिक्षण या क्षेत्रांत प्रश्न जटिल झाले आहेत. त्यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते असोत अथवा जनता यांच्यापुढे वर्तमानात निरनिराळी आव्हाने उभे ठाकलेली आहेत. ते खरेच आहे. विद्यापीठाला नाव दिले गेले, मात्र ही लढाई अजूनही संपलेली नाही. या लढ्याची परिपूर्ती होण्यासाठी आंबेडकरी चळवळीने विविध प्रश्नांवर सुसंघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. वर्तमानात समाजातील धर्मांधता, जातीयता वाढत आहे. देशात आणि राज्यातही शोषित, वंचित, पीडित, दलित, आदिवासींवर अन्याय अत्याचाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. राज्यातील बीड असो अथवा परभणी असो, या ठिकाणी घडलेल्या घटना फार वेदनादायी आहे. नामांतराच्या लढ्यातून आंबेडकरी चळवळीने कोणता बोध घेतला? या साऱ्या पार्श्वभूमीवर आंबेडकरी चळवळीने भावनिक प्रश्नांमध्ये गुंतून न पडता विधायक प्रश्न हाती घेणे, मूलभूत प्रश्नांवर लढे उभे करणे गरजेचे आहे. समाजात राजकारणासाठी अनेकजण मुद्दामहून काही भावनेशी निगडित अप्रिय घटना घडवतात आणि त्याला आंबेडकरी समुदायाकडून अपेक्षित प्रतिक्रिया येऊ लागतात. यातूनच मग क्रिया-प्रतिक्रियावादाचे राजकारण घडत राहते. किंबहुना अशा प्रकारे प्रतिक्रियावादात अडकवून ठेवले जाते. त्यामुळे मूळ प्रश्नांना बगल मिळते. महत्त्वाचे प्रश्न बाजूला पडतात आणि वेगळ्याच गोष्टींभोवती समाजकारण, राजकारण फिरत राहते.

## प्रासंगिक »

### दयावान?

***शहांचा शब्द; त्यानुसार भाजपची स्वबळावर सत्ता येईलच येईल... मग त्या वेळी अर्धी शिवसेना, अर्धी राष्ट्रवादी मिळतील ती राज्यमंत्रीपदे हाच ‘बोनस’ मानणार?***

आपल्याकडे राजकीय तसेच अन्य सर्वच धनिकांस दोन धर्मस्थळांचा मोह आवरता आवरत नाही. एक तिरुपती येथील बालाजी आणि दुसरे शिर्डी येथील साईबाबा. अर्थात हे असले उद्योजक कोण असतात हे सांगण्याची गरज नाही आणि त्याची चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. तथापि या ‘असल्या’ उद्योजकांप्रमाणे राजकीय पक्षही देवदेवतांस आपले भागीदार बनवतात किंवा काय याचा शोध घ्यायला हवा. ही बाब शिर्डीस विशेष लागू होते. कारण अलीकडे अनेक राजकीय पक्षांस शिर्डी या नवतीर्थस्थानाचा मोह पडू लागला असून महाराष्ट्रातील बहुतांश राजकीय पक्षांची अधिवेशने तेथे भरताना दिसतात. कदाचित बहुतेक राजकीय पक्षांतील धनाढ्य नेते शिर्डी आणि परिसरांतून येतात हेही कारण त्यामागे नसेल असे नाही. पूजा असो वा पक्षाचे अधिवेशन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मोहम्मदअली जीना, जमशेदजी कांगा, नानी पालखीवाला, सोली सोराबजी, फली नरीमन या विविध पिढ्यांतल्या नावांमधले साम्य म्हणजे, या साऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीची कारकीर्द केली... वकील किती यशस्वी यापेक्षा किती न्यायप्रिय आहे.

# गोड बोलण्यापेक्षा, न्यायाचे बोला!

यावरच वकिली कारकीर्दीचे मोजमाप होत असते, याची जाण पुढल्या पिढीनेही जपली. इक्बाल छागला हे त्या पुढल्या पिढीपैकी ज्येष्ठ. पण वकिलीच्या उज्ज्वल कारकीर्दीत जे आदल्या पिढ्यांमधील कुणीही केले नाही, ते करण्याची धमक या इक्बाल छागलांनी दाखवली- उच्च न्यायालयातले न्यायाधीशही भ्रष्ट असू शकतात, अगदी मुख्य न्यायाधीशही पैशाच्या मोहात अडकू शकतात... अशा भ्रष्टांनी पदावरून हटलेच पाहिजे, असा ठाम आग्रह इक्बाल छागला यांनी धरला. ‘छागला’ हे आडनाव उच्चारताच अनेकांना ‘रोझेस इ डिसेंबर’ (मराठी अनुवाद : ‘शिशिरातील गुलाब’) या गाजलेल्या आत्मचरित्राचे लेखक आणि मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय मुख्य न्यायमूर्ती मोहम्मदअली करीम ऊर्फ एम.सी. छागला आठवतात, ते या इक्बाल छागलांचे वडील. त्या पुस्तकातल्या प्रसंगांतून सारासार विचाराचे, विवेकाचे जे धडे वाचकांना मिळतात, त्यांपैकी अनेक प्रसंगांचे इक्बाल हे साक्षीदार.



वडिलांप्रमाणेच इक्बाल छागलांनाही न्यायमूर्तीपद मिळणार होते, तेही सर्वोच्च न्यायालयात.‘मी ते स्वीकारले असते तर, सन २००३ पर्यंत सेवाज्येष्ठतेनुसार मी भारताच्या सरन्यायाधीशपदी आलो असतो... बराच विचार केला. अखेर ‘व्यक्तिगत कारणांसाठी नकार’ कळवून टाकला,’ असे इक्बाल छागला सांगत. एरवीही अनेक प्रथितयश वकील, भरमसाट ‘फी’ऐवजी न्यायाधीशांच्या तनख्यावर समाधान मानावे लागू नये अशा हिशेबाने हे पद नाकारतातच... तसेच इक्बाल यांनाही वाटले असेल म्हणणाऱ्यांनी त्यांचे ‘न्यायपालिकेतील पेशांचा वारसा’ या विषयाबद्दलचे विचार जरूर पाहावेत. आदली पिढी न्यायपालिकेत उच्च पदांवर असल्यास तुमच्या कारकीर्दीची सुरुवात अत्यंत सुकर होते... पण पुढे आदल्या पिढीचा लौकिक राखण्याचीच नव्हे तर वाढवण्याची अदृश्य जबाबदारी तुमच्यावर येते’ असे इक्बाल छागला म्हणत. न्यायाधीशांनी स्वच्छ असावे, या आग्रहाला जागून त्यांनी एकप्रकारे, ‘शिशिरातील गुलाबां’चा सुगंध द्विगुणित केला!‘न्या. यशवंतराव चंद्रचूड आणि न्या. पी. एन. भगवती या दोघांपैकी कुणालाही देशाचे सरन्यायाधीशपद देऊ नका... ऐन आणीबाणीत, ‘एडीएम जबलपूर’ खटल्यात या दोघांनी कचखाऊ निर्णय दिला, म्हणून ते नकोत यासाठी तुम्ही आग्रह धरा’ अशी गळ चाळिशीच्या उंबरठ्यावर असताना इक्बाल छागला यांनी थेट जयप्रकाश नारायण यांना घातली होती. या आग्रहाला तोवर निवृत्त झालेल्या एम. सी. छागलांचाही पाठिंबाच होता म्हणतात. ‘जयप्रकाशजी तयार झाले, त्यांनी तसे निवेदन काढण्याचे वचन आम्हाला (स्वत:सह ए. जी. नूरानी यांना) दिले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वाल्मिक कराडवर मकोका!

## 4 दिवसांची न्यायालयीन कोठडी; सीआयडीने मागितला ताबा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संतोष देशमुख हत्या प्रकरणात आतापर्यंत इतर आठ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्वांवर मकोका लावण्यात आला आहे. मात्र, वाल्मिकवर मकोका लावण्यात आला नव्हता. त्याच्यावरही मकोका लावण्यात यावा अशी मागणी होत होती. अखेर वाल्मिक कराडवर आता मकोका लावण्यात आला आहे. त्याच्यावर मकोका गुन्हा दाखल झाल्यानंतर एसआयटीने प्रोडक्शन वॉरंट दाखवून त्याचा ताबा घेतला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा दावा एसआयटीने केला असल्याची माहिती मिळत आहे. या आधी खंडणीच्या गुन्ह्यातही एसआयटीकडेच त्याचा ताबा होता. वाल्मिक कराडला न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर त्याला पहिल्यांदा तुरुंगात नेलं गेलं. त्यानंतर एसआयटीकडून त्याला हत्येच्या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलं.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला आहे. याप्रकरणी १ आरोपी वगळता अन्य सर्व आरोपी तुरुंगात आहेत. तर सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे. या प्रकरणातील मास्टरमाईंड म्हणवल्या जाणाऱ्या वाल्मिक कराडवर देखील आज मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाल्मिक कराड याचे समर्थक बीडमधील वेगवेगळ्या भागात त्याच्या अटकेच्या विरोधात आंदोलन करत आहेत. सीआयडीने आता संतोष देशमुख खून प्रकरणी आता वाल्मिक कराडचा ताबा मागितला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या कटात सहभागी असल्याचा आरोप वाल्मिक कराडवर करण्यात आला आहे. यासाठीच मकोका लावण्यात आला आहे. पण त्याच्यावर दाखल असणाऱ्या खंडणी प्रकरणात त्याला जामीन मिळण्याची शक्यता आहे. ज्यावर आता बुधवारी म्हणजे उद्या सुनावणी पार पडणार आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणी मात्र वाल्मिक कराडच्या अडचणी वाढण्याची चिन्हं आहेत. आज वाल्मिक कराडला केज न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. दोन्ही पक्षाकडून जोरदार युक्तिवाद झाल्यानंतर कराडवर मकोका लावण्यात आला आहे. तसेच १४ दिवसांची न्यायालयीन



कोठडी देखील सुनावण्यात आली आहे. सीआयडीने अर्ज केल्यानुसार उद्या कराडला केज जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले जाणार आहे. एकीकडे सीआयडीने कोठडीची मागणी केली असता दुसरीकडे कराडच्या वकीलांनी खंडणी प्रकरणात त्याच्या जामिनासाठी अर्ज केला आहे. कराडवर मकोका लागल्याने त्यानुसार आता तपासाची चक्र फिरणार आहेत.

ज्यामध्ये कलम ३०२ अंतर्गत संतोष देशमुख प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे. परंतु वाल्मिक कराड अद्याप खून प्रकरणी दोषी ठरलेला नाही. असे असताना त्याने जामिनासाठी अर्ज केला असता मकोकाअंतर्गत त्याला जामीन मिळण्याची शक्यता धुसर आहे. मकोकाअंतर्गत सत्र न्यायालयाकडून जामीन दिला जात नाही. मकोकाअंतर्गत गुन्ह्यात विशेष न्यायालयाकडे जामीनासाठी अर्ज करावा लागतो. जे विशेष न्यायालय छत्रपती संभाजीनगरात आहे. त्यामुळे, मकोका अंतर्गत जामिनासाठी संभाजीनगरच्या कोर्टात अर्ज करावा लागणार आहे. परंतु कराडला सीआयडी कोठडी मिळाल्यास त्याला जामीन मिळणे कठीण असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे. कोर्टाने आज दोन्ही सरकारी वकील आणि आमचा युक्तिवाद ऐकला आणि कोर्टाने त्यांचा पोलीस कस्टडी मागण्याचा अर्ज फेटाळला आहे. तर न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. खुनाच्या गुन्ह्यात वाल्मिक कराडला आरोपी करण्यात आलेले नाही, त्यामुळे मकोका लावण्याचा प्रश्नच येत नाही. पुढे आम्ही न्यायालयीन प्रक्रियेला समोरे जाणार आहोत. तर आता खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आम्हाला जामिनासाठी अर्ज करता येणार आहे. त्यानुसार आम्ही तो केला आहे. परळीत मात्र कराड समर्थक आक्रमक झाले असून परळी बंदची हाक देण्यात आली आहे. राज्य सरकारनेही खबरदारी म्हणून २९ जानेवारी पर्यंत प्रतिबंधात्मक उपाय योजले असून जमावबंदी लागू केली आहे. परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवरवर चढून वाल्मिक कराडच्या समर्थकांकडून आंदोलन करण्यात येत आहे. भाजप आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात कराड समर्थकांनी आंदोलन सुरू केले आहे. परळीमधील त्याचे समर्थक चांगलेच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे.

### वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली

परळी बंदची हाक देण्यात आली आहे. परळीमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. टायर जाळून आंदोलन करण्यात आलं. तसेच यावेळी आंदोलकांकडून बसवर देखील दगडफेक करण्यात आली आहे. त्यामुळे आता परळीचं वातावरण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे.दरम्यान वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर परळीमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कराडच्या समर्थकांनी परळी बंदची हाक दिली आहे. आज केज न्यायालयात वाल्मिक कारडवर आरोप असलेल्या खंडणी प्रकरणी सुनावणी होती. त्यापूर्वी सकाळपासून परळीमध्ये कराडच्या कुटुंबीयांसह समर्थकांनी परळी बंदची हाक दिली होती. इतकेच नव्हे तर वाल्मिक कराडची आईसह कुटुंहबीयांनी परळीत ठिय्या आंदोलन केले होते. तसेच त्याच्या समर्थकांनी पोलीस ठाण्याचा बाहेर आंदोलन सुरू केले आहे.परळीमध्ये वाल्मिक कराडच्या समर्थकांचे आंदोलन सुरू असताना एका तरुणीने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्यांनी या तरुणीला रोखले.

# महाराष्ट्राच्या विजयाचे अनेक अर्थ आहेत

## शरद पवारांनी उडवली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची खिल्ली!

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दोन दिवसांपूर्वीच शरद पवारांवर जोरदार टीका केली होती. तसंच उद्धव ठाकरेंवरही त्यांनी टीका केली होती. शरद पवार यांनी दगा-फटक्याचं राजकारण केलं. उद्धव ठाकरेंनीही दगा फटका केला. पण महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना धडा शिकवला या आशयाचं वक्तव्य अमित शाह यांनी केलं होतं. त्यांच्या टीकेचा शरद पवारांनी शेलक्या शब्दांत समाचार घेतला. ऐरावत आणि कुठे शामभट्टाची तट्टाणी ही म्हणही त्यांनी वापरली.**



“महाराष्ट्राच्या विजयाचे अनेक अर्थ आहेत. महाराष्ट्राच्या विजयाने १९७८ पासून शरद पवारांनी जे दगा फटक्याचं जे राजकारण होतं ते २० फूट गाडण्याचं काम केलं. उद्धव ठाकरेंनी आपल्याशी जो द्रोह केला, २०१९ ला विचारधारा सोडली आणि बाळासाहेब ठाकरेंच्या सिद्धातांशी तडजोड केली. फसवणूक करुन, लबाडी करुन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते. उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राने त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्रात अस्थिरतेचं राजकारण सुरु होतं. ते जनतेने संपवून दाखवलं.” अशी टीका अमित शाह यांनी केली होती. आज शरद पवारांनी पत्रकार परिषद घेत अमित शाह यांचा उल्लेख ते गृहस्थ असा करत उत्तर दिलं.“देशाच्या गृहमंत्र्यांनी शिर्डीत भाषण केलं. भाषण करणं हा त्यांचा अधिकार आहे. पण थोडीबहुत माहिती घेऊन भाषण केलं तर लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. १९७८ चा संदर्भ देऊन अमित शाह यांनी माझी आठवण झाली. १९७८ पासून मी राजकारणात काय केलं त्याचा उल्लेख त्यांनी भाषणात केला. त्यांना कदाचित माहीत नसेल १९७८ मध्ये म्हणजे ४० वर्षांपूर्वी अमित शाह नक्की कुठे माहीत नाही. १९७८ मी राज्याचा मुख्यमंत्री होतो. माझ्या मंत्रिमंडळात जनसंघाचे नेते उत्तमराव पाटील, दुसरे नेते हशू आडवाणी असे जनसंघाचे लोक माझ्या मंत्रिमंडळात होते.

### लोक माझ्या बरोबर काम करत होते

१९७८ च्या पुलोद सरकारची माहिती घेतली तर महाराष्ट्रासाठी चांगलं योगदान दिलं. मी मुख्यमंत्री असताना उत्तमराव पाटील उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होते. हशू आडवाणी नगरविकास मंत्री होते. माझ्या मंत्रिमंडळात कर्तृत्ववान लोक माझ्या बरोबर काम करत होते” असा टोला शरद पवार यांनी लगावला.“अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण आडवाणी यांची नावं घेता येतील. त्यांनी कधी अतिरेकी भूमिका घेऊन राजकारण केलं नाही. भूजला भूकंप झाला तेव्हा देशातल्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलवण्यात आली होती. त्यात भूकंप, अतिवृष्टी या संकटांमध्ये काय केलं पाहिजे त्यासाठी आपात्कालीन स्थितीत काय केलं पाहिजे यावर चर्चा झाली.

# नायजेरियात 40 शेतकऱ्यांची हत्या!

## बोको हराम गटाच्या दहशतवाद्यांनी केला कहर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ईशान्य नायजेरियातील बोर्नो शहरात इस्लामिक दहशतवाद्यांनी ताबडतोब हल्ला केला. या हल्ल्यात 40 शेतकऱ्यांची अमानुष हत्या करण्यात आली आहे. बोर्नो राज्याचे गव्हर्नर बाबागाना उमरा जुलुम यांनी दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्याची जबाबदारी बोको हराम गट आणि इस्लामिक स्टेटशी संबंधित त्यांच्या अन्न गटाने घेतली आहे. या गटांनी हा हल्ला डुम्बा भागात केला असून नारिकांना सैन्याने सुरक्षित क्षेत्रात राहण्याचे आवाहन नायजेरियाच्या सरकारने केले आहे.**



बोर्नो राज्याचे गव्हर्नर जुलुम यांनी या हिंसाचाराच्या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी सशस्त्र दलांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींना कठोर शिक्षा करावी. त्यांनी म्हटले की, “बोर्नो राज्यातील नागरिकांना मी आश्वासन देतो की या हत्याकांडाची चौकशी केली जाईल. मी सशस्त्र दलांना निर्दोष नागरिकांच्या हत्येतील गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आवाहन करतो.” जागतिक घडीमोडी संबंधित बातम्या- एलॉन मस्क बनणार चे नवे मालक? चीनचा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म विकण्याचा विचार मिळालेल्या माहितीनुसार, बोको हरम या गटाने 2009 मध्ये नायजेरियामध्ये पश्चिमी शिक्षणाविरोधात लढा सुरू केला. या दहशतवादी गटाचा उद्देश देशात इस्लामिक शरीयात लागू करणे आहे. गेल्या 14 वर्षांपासून सुरू असलेल्या या संघर्षामुळे नायजेरियामध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचारा झाला असून हा संघर्ष आता आफ्रिकेतील सर्वाधिक दीर्घकालीन उग्रवाद म्हणून ओळखण्यात येतो. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, या संघर्षात आतापर्यंत 35,000 नागरिकांचा बळी गेला आहे, तर 20 लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. नोव्हेंबर 2024 मध्ये बोको हरमच्या संशयित सदस्यांनी तीन गावांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात 15 शेतकऱ्यांना ठार करण्यात आले होते. हा हल्ला कोशेबे, करकुट आणि बुलाबुलिन या गावांमध्ये झाला होता. ही गावे बोर्नो राज्यातील माफा परिसरात असून राजधानी मैदुगुरीपासून अवघ्या 15 किलोमीटर अंतरावर आहेत. शेतकऱ्यांना कापणी करत असताना लक्ष्य करण्यात आले होते. मीडिया रिपोर्टनुसार, 2014 मध्ये बोको हरमने चिबोक गावातून 276 शाळकरी मुलींचे अपहरण केले होते. या घटनेने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले होते आणि नायजेरियातील दहशतवादाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवला होता. या हल्ल्यामुळे नायजेरियामधील सुरक्षिततेच्या स्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकार आणि सुरक्षा दलांनी नागरिकांचे रक्षण करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे.बोर्नो राज्याचे गव्हर्नर जुलुम यांनी या हिंसाचाराच्या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी सशस्त्र दलांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींना कठोर शिक्षा करावी. त्यांनी म्हटले की, “बोर्नो राज्यातील नागरिकांना मी आश्वासन देतो की या हत्याकांडांची चौकशी केली जाईल. मी सशस्त्र दलांना निर्दोष नागरिकांच्या हत्येतील गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आवाहन करतो बोको हरम या गटाने 2009 मध्ये नायजेरियामध्ये पश्चिमी शिक्षणाविरोधात लढा सुरू केला. या दहशतवादी गटाचा उद्देश देशात इस्लामिक शरीयात लागू करणे आहे.

### बोको हरमचा दीर्घकालीन संघर्ष

गेल्या 14 वर्षांपासून सुरू असलेल्या या संघर्षामुळे नायजेरियामध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचारा झाला असून हा संघर्ष आता आफ्रिकेतील सर्वाधिक दीर्घकालीन उग्रवाद म्हणून ओळखण्यात येतो. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, या संघर्षात आतापर्यंत 35,000 नागरिकांचा बळी गेला आहे, तर 20 लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. नोव्हेंबर 2024 मध्ये बोको हरमच्या संशयित सदस्यांनी तीन गावांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात 15 शेतकऱ्यांना ठार करण्यात आले होते. हा हल्ला कोशेबे, करकुट आणि बुलाबुलिन या गावांमध्ये झाला होता. ही गावे बोर्नो राज्यातील माफा परिसरात असून राजधानी मैदुगुरीपासून अवघ्या 15 किलोमीटर अंतरावर आहेत. शेतकऱ्यांना कापणी करत असताना लक्ष्य करण्यात आले होते. मीडिया रिपोर्टनुसार, 2014 मध्ये बोको हरमने चिबोक गावातून 276 शाळकरी मुलींचे अपहरण केले होते. या घटनेने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले होते आणि नायजेरियातील दहशतवादाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवला होता. या हल्ल्यामुळे नायजेरियामधील सुरक्षिततेच्या स्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

# एलॉन मस्क बनणार TIKTOK चे नवे मालक?

## चीनचा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म विकण्याचा विचार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेत टिकटॉक वर बंदी लादली जाण्याच्या शक्यतांदरम्यान चीनकडून एक चकित करणारी बातमी समोर आली आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, जर अमेरिकेने टिकटॉक वर बंदी घालण्याचा निर्णय घेतला तर टिकटॉक ची मूळ कंपनी टिकटॉक हे व्यासपीठ एलॉन मस्क यांना विकण्याचा विचार करत आहे.**

चीनी अधिकाऱ्यांची प्राथमिकता टिकटॉक ला BYTEDANCE च्या नियंत्रणाखाली ठेवण्याची आहे. मात्र, अमेरिकेत टिकटॉकवर बंदी लावण्यात आल्यास एलॉन मस्क यांच्यासोबत व्यवहार होण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, 19 जानेवारी 2025 नंतर अमेरिकेत टिकटॉक वर बंदी लागू करण्यात येणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने संघीय कायद्याला पाठिंबा दिल्यानंतर ही बंदी अटळ झाली आहे. या निर्णयामुळे BYTEDANCE ला टिकटॉक चे अमेरिकेतील संचालन थांबवावे लागेल. माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीनविरोधी धोरणामुळे टिकटॉक वर बंदी





लादण्याचे राजकीय व आर्थिक महत्त्व अधिक स्पष्ट झाले आहे. एलॉन मस्क हे डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे सहकारी आहे. एलॉन मस्क यांनी 2024 च्या अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प ला, रिपब्लिकन पक्षाला पाठिंबा दिला होता. ट्रम्प प्रशासनाच्या नवगठित “DOGE” विभागाचे सह-अध्यक्ष म्हणून मस्क यांची नियुक्ती झाली आहे. यामुळे टिकटॉक खरेदीसाठी त्यांना अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. याशिवाय, टिकटॉक वरील बंदीमुळे INSTAGRAM (META) आणि YOUTUBE (ALPHABET) यांसारख्या अमेरिकी कंपन्यांना मोठा फायदा होऊ शकतो. टिकटॉक च्या अनुपस्थितीत या व्यासपीठांना अधिक युजर्स व व्ह्यूज मिळू शकतात. शॉर्ट व्हिडिओ प्लॅटफॉर्मसाठी स्पर्धा वाढणार असून, अमेरिकन कंपन्यांना वर्चस्व मिळवण्याची मोठी संधी असेल.

### एलॉन मस्क यांची वाढती रुची

ट्विटर खरेदी केल्यानंतर एलॉन मस्क यांनी त्याला X म्हणून रीब्रँड केले. जर एलॉन मस्क यांनी टिकटॉक खरेदी केल्यास हे सोशल मीडिया क्षेत्रातील त्यांचे स्थान अधिक बळकट करेल. SPACEX आणि TESLA यांसारख्या यशस्वी ब्रँड्सचे नेतृत्व करणाऱ्या मस्क यांची TIKTOK खरेदी डिजिटल जगतात मोठा बदल घडवू शकते. टिकटॉकच्या अमेरिकेतील भवितव्याबाबत मोठी अनिश्चितता आहे. बंदीमुळे अमेरिकेतील सोशल मीडिया क्षेत्रात नवा अध्याय सुरू होऊ शकतो.

# रणबीर आणि आलिया न्यूयॉर्कहून परतले



मुंबई विमानतळावर अनेक सेलिब्रिटी दिसले. बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टही पती रणबीर कपूरसोबत स्टायलिश लूकमध्ये विमानतळावर दिसली. याशिवाय दिग्गज अभिनेते अनिल कपूर, सोनू सूद, शमिता शेट्टी आणि नुसरत भरुचा हे देखील स्पॉट झाले होते. अलीकडच्या रॉकी और रानी की प्रेम कहानी आणि हॉलिवूड रिलीज हार्ट ऑफ स्टोनच्या यशानंतर आलिया सध्या रणबीरसोबत न्यूयॉर्कला सुट्टीवर गेली होती. या काळातील अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. आता दोघेही मुंबईला परतले आहेत. शुक्रवारी हे जोडपे मुंबई विमानतळावर स्पॉट झाले. जिथे दोघेही खूप मस्त आणि कम्फर्टेबल लूकमध्ये दिसले. आलिया व्हाईट ओव्हरसाईज टी-शर्ट आणि ब्लॅक पँटमध्ये दिसली. काळ्या गॉगल आणि पांढऱ्या शूजने तिने हा लूक पूर्ण केला. तर रणबीर ऑल ब्लू ट्रॅक सूटमध्ये दिसला होता, ज्यामध्ये तो खूपच सुंदर दिसत होता. त्याला पाहताच चाहत्यांनी त्याला चारही बाजूंनी घेरले. त्यानंतर दोघांनीही विमानतळावर चाहत्यांसमोर जोरदार पोज दिल्या. ६६ वर्षीय अनिल बॉलिवूड इंडस्ट्रीतील सर्वात फिट अभिनेत्यांपैकी एक आहे. विमानतळावर तो खूपच देखणा आणि तरुण दिसत होता. चाहत्यांना पाहून अभिनेत्याने त्यांना नमस्कार केला आणि त्यांच्यासोबत सेल्फीही घेतला. नुसरत भरुचाही विमानतळावर स्टायलिश लूकमध्ये दिसली. तिच्या लूकबद्दल बोलायचे झाले तर तिने काळ्या स्वेट शर्टसोबत गुलाबी ट्राउजर घातला होता. आत गेल्यानंतर पापाराझींसाठी हसतमुख पोझ दिली.



## आर्यनने शाहरुख खानला केले मोटिव्हेट

शाहरुख खान आणि त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जवान' चित्रपटाच्या टीमने नुकतीच मुंबईत एक गेट टुगेदर आयोजित केले होते. यावेळी चित्रपटातील कलाकार आणि क्रूचे सर्व सदस्य एकत्र दिसले. या कार्यक्रमात शाहरुखने तो ब्रेकवर होता तेव्हा त्याला चित्रपटांमध्ये परतण्यास कोणी प्रवृत्त केले हे सांगितले. 'झिरो' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर शाहरुखने 2019 मध्ये 3 वर्षांचा ब्रेक घेतला होता. या कार्यक्रमात शाहरुख म्हणाला, 'मी खूप नर्व्हस होतो कारण मी इतकी वर्षे काम केले नाही. तीन वर्षांनंतर चित्रपटाच्या सेटवर परतणे माझ्यासाठी पूर्णपणे नवीनच होते. त्यावेळी माझा मुलगा आर्यन मला म्हणाला – जेव्हा आम्ही मोठे होत होतो तेव्हा तुमचे स्टारडम काय असते हे आम्हाला माहिती होते.. तुमचे स्टारडम काय आहे हे सुहानालाही माहिती होते. पण या छोट्याला (अबराम खान) फक्त तुम्ही स्टार आहात हे माहिती आहे, त्याला तुमचे स्टारडम कधीच जाणवले नाही. त्यामुळे पुढील 5 चित्रपटांसाठी एवढी मेहनत करा की त्याला हे जाणवेल. या कार्यक्रमात शाहरुखने असेही सांगितले की, तो गेल्या 29 वर्षांपासून चित्रपट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेत आहे.

## नुसरतसह 17 सेलिब्रिटींची ईडी चौकशी



ईडी 5,000 कोटी रुपयांच्या मनी लाँड्रिंग प्रकरणात दुबईतून ऑनलाइन सट्टेबाजी ॲप चालवणारा सौरभ चंद्राकर आणि त्याचा व्यवसाय भागीदार रवी उप्पल यांची चौकशी करत आहे. आता या प्रकरणात टायगर श्रॉफ, नुसरत भरुचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओनसह 17 सेलिब्रिटींचीही चौकशी होऊ शकते. ईडीच्या तपासात सौरभ चंद्राकरचे फेब्रुवारीमध्ये लग्न झाले आणि त्यासाठी २०० कोटी रुपये खर्च झाल्याचे आढळून आले. हवालाच्या माध्यमातून हा पैसा इव्हेंट कंपनी आणि बॉलिवूड स्टार्सपर्यंत पोहोचला. हे अभिनेते आणि गायक या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव बुक ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्या लग्न समारंभात सहभागी झाले होते. दुबईत झालेल्या या लग्नात सौरभने 200 कोटी रुपये खर्च केले. या सर्व सेलिब्रिटींनीही यावेळी परफॉर्म केले. या प्रकरणात टायगर श्रॉफ, सनी लिओन, नुसरत भरुचा, नेहा कक्कर, आतिफ अस्लम, राहत फतेह अली खान, अली असगर, विशाल ददलानी, एली अबराम, भारती सिंग, भाग्यश्री, क्रिती खरबंदा, कृष्णा अभिषेक आणि सुखविंदर सिंग यांच्यासह अनेक सेलिब्रिटी आहेत. चौकशी केली जात आहे. छत्तीसगडचे रहिवासी सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल हे मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात वॉन्टेड आहेत. सौरभ एकेकाळी छत्तीसगडमधील भिलाई येथे ज्यूस विकायचा. ईडीच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर चंद्राकरने रोजी दुबईतील 7 स्टार हॉटेलमध्ये पार्टी दिली होती.

या पार्टीला काही बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली, ज्यासाठी त्यांनी 40 कोटी रुपये आकारले.या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या लग्नासाठी सौरभने आपल्या कुटुंबीयांना नागपूरहून दुबईला खासगी जेटने बोलावले होते. मुंबईहून बॉलिवूड सेलिब्रिटी, वेडिंग प्लानर, डान्सर्स आणि डेकोरेटर्सही दुबईला पोहोचले. या लग्नात या 17 सेलिब्रिटींनी परफॉर्म केले होते. गेल्या वर्षी डिसेंबरपासून सुरू असलेल्या या प्रकरणाच्या तपासात आता बॉलिवूड कनेक्शन समोर आले आहे. महादेव ऑनलाइन बेटिंग ॲप हे एक गेम ॲप आहे जे 30 केंद्रांवरून ऑपरेट केले जाते. आता त्याचे प्रवर्तक दुबईत आहेत जेथे फलंदाजी बेकायदेशीर आहे. शुक्रवारी या प्रकरणी ईडीने भोपाळ, मुंबई आणि कोलकाता येथील 417 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

## शाहरुखच्या जबरा फॅनची कमाल!

बॉलिवूडचा बादशहा शाहरूख खानचा जवान चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ करत असल्याचे पाहायला मिळत आहे. चित्रपट रोज कमाईचे नवे विक्रम करत असल्याचे समोर येत आहेत. मात्र या चित्रपटासाठी चाहत्यांची उत्सुकतादेखील चर्चेचा विषय ठरत आहे. शाहरूखच्या अशाच एका जबरा फॅनची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. शाहरूखच्या या खास चाहत्याचे नाव आहे. अनिस फारुकी. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या या फॅनने चक्क व्हेंटिलेटर थिएटरमध्ये नेत त्याठिकाणी जवान चित्रपटाचा आनंद लुटला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर त्याने त्याबाबतचा व्हिडिओ शेअर केला असून तो व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये शाहरूखचा एक डायलॉग असलेला व्हिडिओ आहे. हाड डायलॉग पाहण्यासाठीच एवढा सगळा प्रपंच केल्याचे सांगत अनिस बरोबर असलेल्या एकाने हा व्हिडिओ शेअर केला आहे. सोशल मीडियावर अपलोड झाल्यापासून या व्हिडिओला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.



## अनिल कपूरने भूमीसोबत रिक्रिएट केले आयकॉनिक गाणे

अभिनेत्री अंकिता लोखंडे अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते.

# कामगिरी नसेल तर खिसा राहील रिकामा!

## क्रिकेटपटूंचे कापले जाणार पैसे, योजनेत होणार मोठा बदल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ज्या खेळाडूची कामगिरीही चांगली असेल त्यांनाच व्हेरिएबल मानधन देण्यात यावे, अशी सूचनाही या बैठकीत करण्यात आली. गेल्या वर्षीच बीसीसीआयने परफॉर्मन्स बेस्ड व्हेरिएबल पे सुरू केली होती. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ : बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मध्ये टीम इंडियाचा ३-१ असा मानहानीकारक पराभव झाल्यानंतर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने, म्हणजेच बीसीसीआयने ११ जानेवारी रोजी आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत संघाचा कर्णधार रोहित शर्मा, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांना प्रश्नोत्तरे विचारण्यात आली. ज्या खेळाडूची कामगिरीही चांगली असेल त्यांनाच व्हेरिएबल मानधन देण्यात यावे, अशी सूचनाही या बैठकीत करण्यात आली. गेल्या वर्षीच बीसीसीआयने परफॉर्मन्स बेस्ड व्हेरिएबल पे (कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना) सुरू केली होती.**




इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्तानुसार, खेळाडू अधिक "जबाबदार" आहेत याची खात्री करणे आणि गरज पडल्यास त्यांच्या कामगिरीच्या आधारे वेतन कपात करणे ही या निर्णयामागील कल्पना आहे. या प्रकारची प्रणाली कॉर्पोरेट क्षेत्रात त्यांच्या कर्मचाऱ्यांवर लागू केली जाते. बीसीसीआयही हीच पद्धत अवलंबू शकते. या नव्या प्रणालीनुसार खेळाडूची कामगिरी चांगली नसेल तर त्याचा परिणाम खेळाडूच्या कमाईवर होतो. सूत्रांनी सांगितले की, "खेळाडूंना जबाबदारी आणि त्यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे होत नसल्याचे आढळल्यास त्यांच्या पगारात कपात करण्यात यावी." गेल्या वर्षीच बीसीसीआयने आपल्या कसोटी खेळाडूंसाठी कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना सुरू केली होती. यानुसार २०२२-२३ या हंगामातील ५० टक्क्यांहून अधिक कसोटी सामन्यांपैकी प्लेईंग इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंना प्रति सामना ३० लाख रुपये आर्थिक प्रोत्साहन मिळेल. त्याच वेळी, टीम इंडियासाठी एका हंगामात किमान ७५ टक्के किंवा त्याहून अधिक सामन्यांमध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक खेळाडूसाठी पेमेंट प्रति सामन्यात ४५ लाख रुपये होईल. जे खेळाडू ५० टक्क्यांपेक्षा कमी सामने खेळतील त्यांना कोणतीही अतिरिक्त रक्कम मिळणार नाही. खेळाच्या सर्वात लांब फॉरमॅटसाठी बोर्डाने जाहीर केलेल्या ४० कोटी रुपयांच्या निधीचा हा एक भाग होता आणि जेव्हा T२० फॉरमॅट आणि इंडियन प्रीमियर लीग खूप आकर्षक होते तेव्हा खेळाडूंना रेड बॉल क्रिकेटकडे आकर्षित करण्यासाठी हे प्रस्तावित करण्यात आले होते. शनिवारी झालेल्या आढावा बैठकीत चर्चा झालेल्या इतर मुद्द्यांपैकी काही खेळाडू कसोटी क्रिकेटला कमी महत्त्व देत आहेत आणि त्यासाठी हेतू दाखवत नसल्याचेही समोर आले. ते व्हाईट बॉल फॉरमॅटला प्राधान्य देत आहेत. पुढील पिढीला कसोटी क्रिकेट आणि भारताच्या कसोटी कॅपचे महत्त्व कळावे यासाठी बोर्डाने या समस्येकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे संघ व्यवस्थापनाला वाटते. गेले काही महिने कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघासाठी वाईट गेले. ऑस्ट्रेलियात १० वर्षे कसोटी मालिका गमावण्यापूर्वी, भारताची १२ वर्षांपेक्षा जास्त काळ घरच्या मैदानावर १८ मालिका जिंकण्याची मालिका न्यूझीलंडविरुद्धही खंडित झाली होती.बीसीसीआयही हीच पद्धत अवलंबू शकते. या नव्या प्रणालीनुसार खेळाडूची कामगिरी चांगली नसेल तर त्याचा परिणाम खेळाडूच्या कमाईवर होतो. सूत्रांनी सांगितले की, "खेळाडूंना जबाबदारी आणि त्यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे होत नसल्याचे आढळल्यास त्यांच्या पगारात कपात करण्यात यावी." गेल्या वर्षीच बीसीसीआयने आपल्या कसोटी खेळाडूंसाठी कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना सुरू केली होती.

### भारताच्या कसोटी कॅपचे महत्त्व

इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंना प्रति सामना ३० लाख रुपये आर्थिक प्रोत्साहन मिळेल. त्याच वेळी, टीम इंडियासाठी एका हंगामात किमान ७५ टक्के किंवा त्याहून अधिक सामन्यांमध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक खेळाडूसाठी पेमेंट प्रति सामन्यात ४५ लाख रुपये होईल. जे खेळाडू ५० टक्क्यांपेक्षा कमी सामने खेळतील त्यांना कोणतीही अतिरिक्त रक्कम मिळणार नाही. खेळाच्या सर्वात लांब फॉरमॅटसाठी बोर्डाने जाहीर केलेल्या ४० कोटी रुपयांच्या निधीचा हा एक भाग होता आणि जेव्हा T२० फॉरमॅट आणि इंडियन प्रीमियर लीग खूप आकर्षक होते तेव्हा खेळाडूंना रेड बॉल क्रिकेटकडे आकर्षित करण्यासाठी हे प्रस्तावित करण्यात आले होते.या प्रकारची प्रणाली कॉर्पोरेट क्षेत्रात त्यांच्या कर्मचाऱ्यांवर लागू केली जाते. बीसीसीआयही हीच पद्धत अवलंबू शकते. या नव्या प्रणालीनुसार खेळाडूची कामगिरी चांगली नसेल तर त्याचा परिणाम खेळाडूच्या कमाईवर होतो.

# रोमहर्षक सामन्यात भारताने केला नेपाळचा पराभव

## खो खो विश्वचषक 2025 : नेपाळचा 42-37 पराभव करून शानदार सुरुवात

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**खो खो विश्वचषक २०२५ : खो-खो विश्वचषक २०२५ च्या पहिल्या आवृत्तीला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेमध्ये पुरुषांचे २० संघ सहभागी झाले आहेत. तर महिलांचे १९ संघ सहभागी झाले आहेत. भारत विरुद्ध नेपाळ यांच्यामध्ये सामना खेळवण्यात आला. या सामन्यांमध्ये भारताने सोमवारी इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर नेपाळचा ४२-३७ असा पराभव करून खो खो विश्वचषक २०२५ मध्ये शानदार सुरुवात केली.**



भारताच्या अष्टपैलू कामगिरीने, कर्णधार आणि संघ वझीर प्रतीक वायकर यांच्या नेतृत्वाखाली खो खोचा एक नेत्रदीपक दिवस रंगतदार उद्घाटन समारंभाने पार पाडला, ज्यामुळे संघाला चमकदार ट्रॉफीसाठी स्पर्धा सुरू ठेवण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळाले.भारताने शानदार सुरुवात केली आणि सामन्याच्या पहिल्याच वळणात अवघ्या ६० सेकंदात नेपाळच्या पहिल्या तीन बचावपटूंचा नाश केला.

प्रतिक वायकर आणि रामजी कश्यप यांच्या नेत्रदीपक उडत्या उड्डाणांमुळे भारताने टर्न १ मध्ये तीन मिनिटे शिल्लक असताना १४-गुणांची आघाडी घेतली, ज्यात त्यांनी नेपाळच्या दोन बचावपटूंना बाहेर काढले. प्रतिक वायकरच्या जागी 'वझीर' म्हणून आलेल्या सचिन भार्गोने रात्रीची उत्तम चाल दाखवली. त्याने नेत्रदीपक स्कायडाईव्ह करत ब्रेकमध्ये स्कोअर २४ टच पॉइंटवर नेला, ज्यामुळे नेपाळ संघ 'ड्रीम रन' गाठू शकला नाही.ड्रीम रनमध्ये, बचावपटू मॅट न सोडता तीन मिनिटे टिकतात, त्यानंतर बचाव करणारा संघ दर ३० सेकंदांनी एक गुण मिळवतो. टर्न २ मध्ये सहा गुण मिळवण्यासाठी नेपाळला जवळपास दोन मिनिटे लागली, परंतु त्यांनी जोरदार पुनरागमन केले.

### भारताने 42 गुणांवर मजल मारली

नेपाळला त्यांच्या वळणावर २० गुण मिळवण्याची संधी देत भारतीय बचावपटूंना स्वप्नवत धावसंख्या गाठण्यापासून रोखले गेले. नेपाळचा अष्टपैलू जोगेंद्र राणा मुख्य आक्रमण करणारा खेळाडू म्हणून उदयास आला, त्याने दोन डाईव्हसह चार गुण मिळवून आपल्या संघाला स्पर्धेत टिकवून ठेवले. खो खो विश्वचषक २०२५ ची पहिली ड्रीम रन नेपाळच्या भरत सरूने केली होती, परंतु ती अपुरी ठरली कारण भारताने २४ गुणांवरून ४२ गुणांवर मजल मारली आणि खेळाच्या चौथ्या वळणावर यजमानांची आघाडी २१ गुणांवर नेली.